Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- VII JULY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# महात्मा गांधीजींचे मद्यपान विषयक विचार : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. रामराव धेनू चव्हाण**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव
ता . चाकूर जि. लातूर (महाराष्ट्र)

**प्रस्तावना : -**

भारत देश अनेक समस्यांनी ग्रासलेला आहे. त्यातील प्रमुख समस्या म्हणजे वाढती लोकसंख्या, दारिद्रय, बेकारी, भ्रष्टाचार , दहशतवाद, महागाई, प्रदुषण, कौटुंबिक हिंसाचार व सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे मद्यपान होय. मद्यपान ही आज महाराष्ट्र, भारत व जागासमोरील एक गंभीर सामाजिक समस्या आहे. भारतीय समाजात प्राचीन काळापासून मद्यपानाची समस्या अस्तीत्वात आहे. त्यामुळे मानवाच्या इतिहासाइतकाच मद्याचा इतिहास हा प्राचीन आहे. पुरातन काळी भारतात मद्याचा उल्लेख 'मदीरा' किंवा 'सोमरस' असा करण्यात आला आहे. त्याकाळी कंदमुळे व फळापासून उत्तेजक पेय किंवा आरोग्यदायी पेय म्हणून वापर करण्यात येत होते . तसेच अनेक औषधी वनस्पतीच्या अर्कातून मिश्रीत 'सुराची' निर्मित केल्या जात होती व ते प्राशन करण्याची पद्धत रूढ होती. पूर्वीच्या काळी मद्यपान हे फक्त राजे, महाराजे, सरदार, जहागीरदार इत्यादी मोठ्या व श्रीमंत लोकांपुर्तेच मर्यादित होते. परंतु जेव्हा इंग्रज लोक भारतात आले. त्यावेळी मुक्तपणे मद्यपानाच्या प्रमाणात वाढ झाली आणि समाजातील गरीब-श्रीमंत सर्वच स्तरातील लोक मद्यपान करू लागले. आज अनेक आदिवासी लोक मोह फुलांची हातभट्टी दारू बनवतात. आधुनिक काळातील भौतिक सुख-सोयींची समृद्धी आणि औद्योगिक विकासाबरोबर मद्यपानाची समस्या निर्माण झाली. आधुनिकीकरण व नागरीकरणाच्या या जागतिक प्रक्रियेमुळे मानवी समाजात अमुलाग्र बदल झाला. त्यात मानवी प्रथा, चालीरीती, आचार विचार, श्रद्धा, विश्वास, सण-समारंभ व उत्सव अशा सर्वच बाबतीत परिवर्तन घडून आले. म्हणून आज नागरी व ग्रामीण भागातील तरुण पिढी मोठ्या प्रमाणात हायप्रोफाईल व्यसनांकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते. सिगारेट, तंबाखू, चरस, गांजा, हेरॉईन, कोकेन व दारु इत्यादी व्यसनांच्या आहारी जाऊन आजची तरूण पिढी आपले जीवन नष्ट करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे मद्यपान ही केवळ व्यक्तीच्या जीवनाशी निगडित असणारी समस्या नाही. तर त्याचा संबंध मद्यपी व्यक्ती, कुटुंब तसेच समाजाशी येतो.

भारतातील तरुणाई आज मोठ्या प्रमाणात मद्याच्या आहारी जाऊन अनेक आजारांना आमंत्रण देत आहे. त्यामुळेच "भारतात अतीमद्यपनामुळे लिव्हर 'सोरॉसीस' या महाभयंकर रोगामुळे दरवर्षी १ लाख ४० हजार लोक प्राण गमवतात व दारुच्या नशेमध्ये गाडी चालविल्याने दरवर्षी एक लाख दारुडे मरतात किंवा दुसऱ्याला मारतात." यावरून हे स्पष्ट होते की, अतीमद्यपान करणाऱ्या लोकांना अनेक दुष्परिणामांचा सामना करावा लागतो. कारण दारूच्या व्यसनामुळे विविध समस्या निर्माण होतात. दारूमुळे अनेकांच्या सुखी कुटुंबाची राखरांगोळी होते. तसेच दारुच्या व्यसनामुळे व्यक्तीचे जीवन उध्वस्त होऊन त्यांच्या कुटुंबाचे, समाजाचे व राष्ट्राचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान होते . म्हणून गांधीजींच्या मते, दारु व सर्व अमली पदार्थ व्यक्ती, समाज तसेच देशाच्या विकासातील सर्वात मोठा शत्रू असून लोकांनी वाईट व्यसनांपासून दूर राहणे आवश्यक आहे. प्रस्तुत शोधनिबंधात गांधीजींच्या मद्यपान विषयक विचारांचा समाजशास्त्री दृष्टीने आढावा घेण्यात आला आहे.

**मद्यपानाची संकल्पना : -**

'मद्य' हे एक अल्कोहलयुक्त मादक द्रव्य पेय आहे. सर्वच मद्यामध्ये इथील अल्कोहोलचा समावेश असतो. अल्कोहल हा इंग्रजी शब्द अरबी भाषेतील 'अल' आणि 'कोहोल' या दोन शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ चांगल्या रितीने मोहून जाणे होय. अल्कोहोलला मराठी भाषेत

दारू किंवा मद्य म्हणतात. मद्यपानचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी समाजशास्त्रज्ञ शेल्डन बेकन म्हणतात की, "मद्यपान ही एक अशी व्याधी आहे की, ज्यामध्ये जीवनातील सामान्य प्रश्नांना तोंड देण्यासाठी व्यक्तीस सतत मद्य प्राशन करावे लागते." तसेच डॉ. डरफी म्हणतो, "मद्यपान ही अशी सवय असते की, ज्यामुळे व्यक्ती शारीरिक समस्यांनी ग्रस्त होते. कौटुंबिक सौख्याचा लोप होतो आणि विविध सामाजिक प्रश्न निर्माण होतात." थोडक्यात वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, मद्यपान म्हणजे दारु पिणे होय. कोणत्याही माणसाला एकदा मद्याचे व्यसन लागल्यास त्यापासून त्याची सुटका होत नाही. त्यामुळे अनेक व्यक्ती दारुच्या वाईट व्यसनाच्या विळख्यात अडकतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) मद्यपानाची संकल्पना समजावून घेणे.

२) मद्यपानास जबाबदार असणाऱ्या कारणांचा शोध घेणे.

३) महात्मा गांधीजींच्या मद्यपान विषयक विचाराचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहीतकृत्य :-**

१) मद्यपान ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे.

२) आधुनिक काळात मद्यपानास अनेक घटक जबाबदार आहेत.

३) महात्मा गांधीजींचे मद्यपान विषयक विचार आजच्या पिढीला तारक आहेत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्याचा अवलंब केलेला आहे. त्यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ , वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके व इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच सदर शोधनिबंधात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**मद्यपानास जबाबदार असणारे घटक :**

भारतीय समाजात मद्यपनाची समस्या गतीमान होत आहे. मद्यपानाची अनेक कारणे असली तरी लोक कशासाठी व कोणत्या कारणास्तव मद्यपान करतात. यासंदर्भात मद्यपानास अनेक घटक जबाबदार आहेत. त्यात प्रामुख्याने मित्रमंडळीची संगत, वाढती बेकारी, गरिबी, अज्ञानपणा, आजारपण, जिवनात येणारे संकट, वृद्धावस्था, अंधश्रद्धा, कौटुंबिक ताणतणाव, शारीरिक कष्ट, औद्योगीकरण व नागरीकरण इत्यादी कारणांमुळे आज दिवसेंदिवस मद्यपान करणाऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे.

**महात्मा गांधीजींचे मद्यपान विषयक विचार :**

भारतामध्ये ब्रिटिशांनी साम्राज्याच्या विस्ताराबरोबर मद्यपानाचाही मोठ्या प्रमाणात प्रसार केला होता. त्यामुळे ब्रिटिश सरकारने १७९० मध्ये दारु विक्रीवर सर्वप्रथम अबकारी कर लावला. तेव्हापासून भारतात मद्यपनाची समस्या चिंताजनक बनली होती. तेव्हा महात्मा गांधीजींनी इंग्रजांच्या विरोधी भारतीय स्वतंत्र लढ्याचे नेतृत्व करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. तसेच भारतीय समाजातील अतिशय वाईट व्यसने दूर झाली पाहिजे याद्दष्टीने स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबरच प्रत्यक्ष कार्येही केले. आजच्या धावपळीच्या व फॅशनच्या नादात जीवन जगणाऱ्या युवकांमध्ये अनेक कारणांमुळे व्यसनांचे प्रमाण वाढत आहेत. त्यामुळे व्यसनांच्या विळख्यात सापडलेल्या भारतीय समाजाला विशेषता: युवकांना वाचविण्यासाठी महात्मा गांधींची विचारधारा अतिशय महत्त्वाची आहे. विशेष महत्त्वाचे म्हणजे गांधीजींवर बालपणापासूनच चांगले संस्कार झाले होते. त्यांचा स्वभाव शांत, संयमी, सत्यवादी आणि पापभिरू असा होता. तरीही बालपणात त्यांच्याकडून काही वाईट कार्य घडले होते. काही वाईट व्यसनसुद्धा त्यांनी केले होते. वयाच्या १२-१३ यावर्षी एका जवळच्या नातेवाईकामुळे त्यांना सिगारेट ओढण्याची सवय लागली. मात्र पैसा नसल्याने ते आपल्या काकांच्या अर्ध्या फेकलेल्या सिगरेटच्या तुकड्यांचा उपयोग करीत तर कधी नोकरांच्या खिशातील पैसे चोरत असत. त्यामुळे त्यांच्यात नैराश्य निर्माण झाले होते व ते आत्महत्या करण्याच्या विचारापर्यंत पोहोचले होते. परंतु लगेच सावरून त्यांने आत्महत्येचा विचार सोडून दिला. त्यानंतर लवकरच हे व्यसन त्यांनी सोडले. पुढे ते असे म्हणू लागले की, सिगरेट पिण्याची सवय ही अत्यंत वाईट व हानिकारक आहे. मला हे समजत नाही की, जगात विडी सिगारेट पिण्याची सवय इतक्या मोठ्या प्रमाणात का आहे. शेवटी तर याबाबत त्यांच्या मनात इतकी घृणा निर्माण झाली की, त्यांना सिगारेटच्या धुराजवळ बसणे कठीण झाले, त्यांचा श्वास रोखला जात असे. पुढील काळात ते "इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी बॅरिस्टर होण्यासाठी जाणार असल्याने त्यांच्यावर तेथील पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडून ते

मांसाहार आणि पाश्चात्य व्यसनांना बळी पडतील, अशी भीती वाटत होती. म्हणूनच यासंबंधाने त्यांच्या आईने मद्यपान, स्त्रीसहवास आणि मांसाहार न करण्याबाबत कबूल करून घेण्यात आले होते."

भारतामध्ये महात्मा गांधीजीनी दारू , भांग, गांजा, चरस व तंबाखू याचा मादक पदार्थांमध्ये अंतर्भाव केला. आपल्या देशात सर्वात जास्त दारुचा उत्पन्न आणि वापर केला जातो. दारूच्या आहारी गेल्यामुळे मनुष्य स्वतःचे भान विसरून जातो आणि निरुपयोगी बनतो. मद्यपान करणे म्हणजे अधोगतीकडे जाणे आणि आपल्या कुटुंबाला व स्वतःलाही उध्वस्त करणे होय. म्हणून प्रत्येकांनी मद्यपानाचा त्याग करून त्याला विरोध करावा असे स्पष्ट मत गांधींनी मांडले होते. कारण मद्यपान करणे हे फार वाईट व्यसन आहे. म्हणून यासंदर्भात राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणतात की, "भारतातील कित्येक राजे-राजवाडे दारूच्या अतिव्यसनाने बरबाद झाले आणि होत आहेत. श्रीमंताची मुले व मजूर वर्ग यांचीही स्थिती अशीच आहे. त्यामुळेच मी मद्यपानाचा कट्टर विरोधक आहे. कारण मद्यपानामुळे व्यक्ती शरीराने, मनाने आणि बुद्धीनेसुद्धा कमजोर होतो व संपत्तीचा नाश करतो. म्हणून एक वेळ आपला भारत गरीब राहिला तरी चालेल, परंतु देशातील लाखो लोक नशेबाज झालेले मला आवडणार नाही" यावरून हे लक्षात येते की, दारूचे व्यसन हा एक रोगच आहे. दारूच्या सवयीमुळे माणसाच्या आत्म्याचा संपूर्ण नाश होतो. त्यामुळे मद्यपी हळूहळू पशु बनून त्याला पत्नी, आई व बहिण यांच्यातील फरक समजेनासा होतो. तेव्हा मद्यपी दुष्कृत्य करावयास घाबरत नाही. आपल्या देशात तंबाखू, सिगारेट व दारूच्या वापरामुळे अनेक फायदे होतात असे लोकांमध्ये गैरसमज आहेत. परंतु गांधीजींचे स्पष्ट मत आहे की, त्याचा कुठलाही फायदा मानवला होत नाही.

दक्षिण अफ्रिकेतील अनेक लोक मद्यपानाच्या आहारी गेल्यामुळे स्त्री-पुरुषांची अवस्था फार हलाखीची झालेली होती. इंग्रजासारख्या शिक्षित व्यक्तीमध्ये व्यसनामुळे अध:पतन झाल्याचे अनुभव त्यांना आले होते. गांधीजी जेव्हा दक्षिण आफ्रीकेतून परत भारतात आले. तेव्हा त्यांना अत्यंत दु:खद अनुभव आले. त्यावेळी व्यसनांमुळे भारतीय मजुरांची स्थिती खूपच वाईट झाली होती. म्हणून देशातील युवक वर्गाला व्यसनांपासून वाचवणे महत्त्वाचे होते. त्यासाठी गांधीजींनी पुढाकार घेतला. त्यानंतर त्यांनी भारतीय समाजाचे निरीक्षण करून अनेक महत्त्वाच्या चळवळी सुरू केल्या असूनही त्यातील 'दारूबंदी' ही महत्त्वाची चळवळ होय. इ. स. १९३० मध्ये असहकार चळवळी बरोबरच भारतीय समाजातील समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने 'दारूबंदी' व्हावी या उद्देशाने एकूण ११ मागण्यांचे निवेदन गांधींनी इंग्रज सरकारला दिले होते. दारूबंदीच्या बाबत म. गांधी म्हणाले होते की, "मला केवळ एक तासाकरिता जर भारताचा हुकूमशहा बनविले, तर सर्वप्रथम मी दारुची सर्व दुकाने त्यांच्या मालकांना कोणतीही नुकसान भरपाई न देता बंद करावयास लावीन." त्याचबरोबर पुढे ते म्हणतात, "भारत गरीब राहिलेला चालेल, पण आमच्यातील लाखो लोकांनी नशेबाज झालेले मला परवडणार नाही. अबकारी उत्पन्नातून शिक्षण चालविण्यापेक्षा दारूबंदीमुळे शिक्षण बंद करावे लागले तरी चालेल. नशाबंदीकरता ही किंमत मला परवडेल." यावरून हे स्पष्ट होते की, गांधीजींनी पाहिलेल्या स्वप्नातील भारताच्या निर्मितीकरिता त्यांनी स्वतंत्र्यापूर्व काळापासूनच दारूबंदी चळवळीची सुरुवात केली. परंतु दारूच्या विक्रीतून शासनाला मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या महसुलाचा मोह सुटत नाही. म्हणूनच आजही देशात दारूबंदीचे धोरण यशस्वी झालेले दिसत नाही. त्यामुळे भारतात मद्यपानाची वाढती समस्या चिंताजनक बनलेली आहे.

**निष्कर्ष :**

मद्यपान ही विघटनात्मक व सार्वत्रिक स्वरूपाची गंभीर सामाजिक समस्या आहे. मद्यपानाचा व्यक्तीच्या शरीरावर, कुटुंबावर, समाजावर आणि राष्ट्रवरही विपरीत परिणाम होतो. आधुनिक काळात भारतीय समाजात अनेक कारणामुळे मद्यपानाचे प्रमाण वाढत आहे. अलीकडील काळात देशी, विदेशी व हातभट्टीची गावठी दारु खेड्यापाड्यातही सहजपणे मिळत आहे. मद्याच्या आहारी गेल्यामुळे अनेकांना वाईट परिणामांचा सामना करावा लागतो. त्यामुळे महात्मा गांधीजींनी तरुणांना मद्याच्या व्यसनापासून राहावे यासाठी महत्वाचे प्रयत्न केले. मद्यपानाचा भारतातील लोकांवर विशेषतः युवक-युवतींवर घातक परिणाम झाला आहे. मद्यपानामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात तरीसुद्धा दारूच्या विक्रीमुळे शासनाला

मोठ्या प्रमाणात महसूल मिळाल्यामुळे दारुबंदीकडे शासनाचे दुर्लक्ष आहे.

अशाप्रकारे भारतीय समाजात प्राचीन काळापासून आजपर्यंत अस्तित्वात असलेली मद्यपनाची समस्या आज चिंताजनक बनली आहे. मद्य प्राशन करणे हे किती घातक असते. दारूच्या आहारी गेल्याने अनेक बरबाद झाले व होत आहेत. म्हणून गांधीजींचे हे विचार समाजाला व तरुण पिढीला तारणारे आहेत. परंतु सरकारच्या लवचिक धोरणामुळे भारतात अद्यापही संपूर्ण दारुबंदीला यश मिळाले नाही.

**संदर्भ ग्रंथ :**

१) आगलावे, प्रदीप. (१९९७). *आधुनिक भारतातील सामाजिक समस्या,* विद्या प्रकाशन, नागपूर.
२) संगवे, विलास. (१९७९). *भारतातील सामाजिक समस्या,* पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
३) अहुजा, राम. (२०१६). *सामाजिक समस्याऐं,* रावत पब्लिकेशन्स, जयपुर.
४) सरदेसाई, ह. वी. (२०१५). *मद्यपान एक भयावह आजार,* श्री विद्या प्रकाशन, पुणे.
५) महात्मा, गांधी. (१९०६). *आरोग्याची किल्ली,* परंधाम प्रकाशन, ग्रामसेवा मंडळ पवनार जि. वर्धा.
६) महात्मा, गांधी. (२०१२). *माझ्या स्वप्नांचा भारत,* परंधाम प्रकाशन, जि. वर्धा.